Govt. of India
Registered Trademark
Regd. No. 3418002

Editor
Dr.Bapu G.Gholap

ISSN 2394-5303

# Printing Area®

Peer reviewed International Refereed Journal

Issue-86, Vol-04, February 2022

www.vidyawarta.com

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

# प्रिंटिंग एरिया

## Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

February 2022, Issue-86, Vol-04

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed

Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295

harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# Editorial Board & review Committee


- **Chief Editor**
Dr Gholap Bapu Ganpat
Parli Vaijnath,Dist. Beed Pin-431515 (Maharashtra)
9850203295, 7588057695
vidyawarta@gmail.com

- **M.Saleem**
saien Ghulam street
Fatehgarh Sialkot city
Pakistan. Phone Nr. 0092 3007134022
saleem.1938@hotmail.com

- **Dr. Momin Mujtaba**
Faculty Member,Dept. of Business Admin.
Prince Salman Bin AbdulAziz University
Ministry of Higher Education,Kingdom of Saudi Arabia, Tel No.: +966-17862370 Extn: 1122

- **N.Nagendrakumar**
115/478, Campus road,
Konesapuri, Nilaveli ( Postal code-31010),
Trincomalee, Sri Lanka
nagendrakumarn@esn.ac.lk

- **Dr. Vikas Sudam Padalkar**
vikaspadalkar@gmail.com
Cell. +91 98908 13228 (India),
+ 81 90969 83228 (Japan)

- **Dr. Wankhede Umakant**
Navgan College, Parli –v Dist. Beed
Pin 431126 Maharashtra
Mobi.9421336952
umakantwankhede@rediffmail.com

- **Dr. Basantani Vinita**
B-2/8, Sukhwani Paradise,
Behind Hotel Ganesh, Pimpri,
Pune-17 Cell: 09405429484,

- **Dr. Bharat Upadhya**
Post.Warnanagar, Tq.Panhala,
Dist.Kolhapur-4316113
Mobi.7588266926

- **Jubraj Khamari**
AT/PO - Sarkanda, P.S./Block - Sohela
Via/Dist. - Bargarh, Pin - 768028 (Orissa)
Mob. No. – 09827983437
jubrajkhamari@gmail.com

- MISS. VARSHA ANILRAO TIDKE
FULE-AMBEDKAR COLLEGE OF SOCIAL WORK,
HANUMAN NAGAR, REVENUE COLONY, GADCHIROLI
9421857700
varshaatidke21@gmail.com

- **Dr Trushna S Kalambe**
66 Ayodhyanagar behind
sai Mandir lane no 2 Nagpur-440024

- **Dr. Ambhore Shankar**
Jalna,Maharashtra
shankar296@gmail.com
Mobi.9422215556

- **Dr. Sumit Prasad**
Professor Colony, Kankarbagh,
PO – Lohia Nagar,Patna – 800 020 (Bihar)
prasadsumit78@gmail.com

- **Prof. Surwade Yogesh p**
Dept. Of Library, Dr B A M U Aurangabad , Pin 431004
**Cell No:** +919860768499
yogeshps85@gmail.com

- **Dr.Deepak Vishwasrao Patil,**
At.Post.Saundhane, Near
Kalavishwa Computer, Tq.Dist.Dhule-424002.
Mobi. 9923811609
patildipak22583@gmail.com

- **Dr.Vidhya.M.Patwari**
Vanshree Nagar,Behind Hotel
Dawat, Mantha Road, Jalna-431203
Mobi.9422479302
**patwarivm@rediffmail.com**

- **Dr. Varma Anju**
Assistant Professor, Dept. of Education,
Sikkim University 6th Mile, Samdur Tadong-737102
GANGTOK - Sikkim, (M.8001605914)
anjuverma2009@rediffmail.com

- **Dr. Dinesh Kumar Charan**
Associate Professor and HOD-History Dept.,
Govt.Lohia College Churu (Rajasthan) India
Pin- 331001
**Mob. No.-9414305804**

# INDEX

01) Emotional Advertisement and Customer Attraction
Jivaraj Shivajirao Andhale, Dr. Giram S.J., Aurangabad. ||10

02) ECO-CRITICAL PERSPECTIVES IN THE HOLY BIBLE
Manisha Gaikwad, Yeola. ||12

03) Problem Solving Behaviour: An Essential Cognitive Skill for ......
Dr. Jameer Ilahi Momin, Satara. ||16

04) Contribution of some major business community to development of....
Mr. Govind Chandrakant Kamble, Pune ||26

05) THE RIGHT TO PRIVACY & CLASH WITH RTI: The Conflicting Laws & .......
Dr. Avdhesh Singh Rathore, Mr. Vikas Parashar, Gwalior (M.P.) ||30

06) INSURANCE SECTOR IN INDIA ASPECTS AND PROSPECTS
DR.NAVDEEP DADHICH ||41

07) Role of Psychological Participation on work Motivation of Employees
Dr. Seema Kumari, Jharkhand ||43

08) Value Education Concepts as Reflected in Philosophy of Swami Vivekanand
Ranjana Singh, Ranchi ||45

09) The Santhal Hool (Revolt) 1855. A Historical and Geographical Study
Mohan Singh, Gwalior (M.P) ||49

10) Comparative Conductometric investigation and Micellar Behaviour.....
Dr. Chandrawati, ANOOPSHAHR (U.P.) ||52

11) A STUDY OF CONSUMER ATTITUDE TOWARDS ONLINE SHOPPING
Dr. P.N.Tiwari, Jyoti Mandral, Rudrapur (U.S.Nagar) ||56

12) Role of NHRC as a Human Rights Protector
Dr. Sanjay Kumar Raipuriya, Alwar (Raj.) ||63

13) Causes that converts Jharia's mines into flames and measures that......
Miss. Arpana, Dr. Ram Prawesh Prasad SINGH, Dhanbad ||67

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

14) Evolution of E-Learning during the COVID-19 Pandemic
**Dr Sumit Chauhan, Janakpuri, New Delhi** ||72

15) PROBLEM OF THE CHILD MIGRATION
**Swagatika Sahu, Prof. Sabita Achayra** ||77

16) Significant Trends in Medicinal Chemistry
**Dr. Kishore Nabajirao Koinkar, Kada, Beed** ||82

17) A comparative analysis of the marketing strategies of Nokia and Samsung
**Virali Prakash, Sushmita Banerjee, Delhi** ||88

18) पाडा या कादंबरीतील ग्रामीण वास्तवात्मक आशय
**डॉ. सचिन अशोक पाटील, एरंडोल** ||98

19) 'अंत:स्थ' : मानवमुक्तीचा जळजळीतअंगार'
**डॉ. रमेश व्ही. देवडे, खुलताबाद** ||100

20) 'नटसम्राट'एक आकलन
**श्रीकांत दत्तात्रय तनपुरे, खर्डा** ||104

21) क्षारयुक्त जमिन होण्याची कारणे व उपाय: एक अभ्यास
**डॉ. बबन बाबुराव बोबडे, बीड** ||108

22) महिलाओं के कानूनी अधिकार
**डॉ. प्रियंका सामंत, अलवर (राज.)** ||110

23) "भारत में आतंकवाद की समस्या"
**डॉ.सिध्देश्वर सटाले, गेवराई** ||115

24) अनुसूचित जातियों के मानवाधिकार
**डॉ. प्रियंका सामंत, अलवर (राज.)** ||117

25) पुस्तकालयकालयों में आय–व्यय नियंत्रण प्रविधी
**गरिमा छाबड़ा, चुरू, (राजस्थान)** ||120

26) ग्वालियर जिले के स्वतंत्रता सेनानियो पर महात्मा गाँधी के अहिंसा.....
**डॉ. भारत भूषण, ग्वालियर (म.प्र.)** ||122




www.vidyawarta.com/03 – http://www.printingarea.blogspot.com

नागों वटवटल्या'

हे असे परिवर्तन संस्कृतीचे स्वरूप भयक करून दिसतात तर,

खदखदलेल्या नजरा

वासनेची कान

मनातील हात वाटलेले'' (पृ.७५,७६)

स्त्री देहासाठी खदखदलेल्या बीभत्स नजरा, एकीकडे धर्मांध जातीयवादी तर दुसरीकडे वासनांध 'ढोंगी संन्याशी' स्त्रियांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगण्यास धजिकिंतही करत नाहीत. ही समाजाला लागलेली कीड आहे'' इथली समाजव्यवस्था, शासन व्यवस्था, धर्मव्यवस्था, मार्केटिंग व्यवस्था, उद्योग व्यवस्था यांनी वेगळेच प्रश्न निर्माण केले आहेत.''क' कुराण सारख्या कवितेतून उघड्या नागड्या समाजाचे चित्रण येते तर भ्रष्टाचारी मनोवृत्ती, धर्माच्या नावावर होणाऱ्या कत्तली, स्त्रीदेहाची विटंबना, कोवळ्या मुलींवर होणारे पाशवी अत्याचार बलात्कार अशी स्त्रीजीवनाची दुःखद व्यथा मांडून कवी आजच्या 'वृत्तपत्राची' विद्रुपता आपल्यासमोर ठेवतात. स्त्री देहाची विटंबना चालू असताना कवी आपल्याला 'केतेच्या गावाला' घेऊन जातात आणि 'माय माऊली'च्या ओंजळीत एक सुखद हळूवार झुळका घेऊन स्वतः 'मायमाऊली'च्या प्रेमात भिजून येतात व आपल्यालाही अंतर्मुख करून टाकतात.

कवीची संवेदनशीलता, व्यापक अनुभव, मानवतेचा हुंकार, माणसासाठी गायलेलं गाणं, तसंच 'मानवमुक्तीचा जळजळीत अंगार' व्यक्त करण्याची हातोटी अस्वस्थ करून जाते. त्यांची लेखणी माणुसकी लोप पावत चाललेल्या समाजात माणुसकी जिवंत ठेवण्याचे कार्य करताना दिसून येते.

**संदर्भ**

१. काव्यबंध–डॉ. मिरदेव गायकवाड, पृ.०९
२. मराठी कविता परंपरा आणि दर्शन–संपा. डॉ. रवींद्र शोभणे, पृ.२१६
३. अंतःस्थ– प्रस्तावना, डॉ. प्रल्हाद लुलेकर पृ.०५
४. काव्यबंध–डॉ. मिरदेव गायकवाड, पृ.०९
५. अंतःस्थ– प्रस्तावना, डॉ. प्रल्हाद लुलेकर पृ.०६
६. तैत्र– पृ.०९
७. तैत्र– पृ.०५

**20**

# 'नटसम्राट'एक आकलन

**श्रीकांत दत्तात्रय तनपुरे**
सहाय्यक प्राध्यापक
श्री संत गजानन महाविद्यालय, खर्डा

**प्रास्ताविक :**

वि.वा.शिरवाडकर लिखित 'नटसम्राट' हे नाटक मराठी रंगभूमीवर १९७०मध्ये आले आणि पुस्तकरूपाने १९७१मध्ये प्रकाशित झाले. नटसम्राटच्या भाषेची जादू आणि कुठल्याही कसबी नटाला आव्हान वाटेल अशी अप्पासाहेब बेलवलकरांची व्यक्तिरेखा आजही अनेकांना आकर्षित करते. त्यामुळे आजही रसिकमनावरील या नाटकाची पकड कमी झालेली नाही हे या नाटकाचे खूप मोठे यश आहे. या नाटकाने प्रयोगदृष्ट्या आणि साहित्यिक दृष्टीने नाट्यसृष्टीत इतिहास घडविला आहे. नटसम्राट या नाटकाला घ्श्क्त्ड सालचा राज्य नाट्य पुरस्कार मिळाला तर या नाटकाच्या लिखाणासाठी शिरवाडकरांना १९७४ सालचा साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.

नटसम्राटच्या संहितेचे मूळ शेक्सपिअरच्या 'किंग लिअर'मध्ये असले तरी शिरवाडकरांच्या प्रतिभेने झेप घेऊन ह्या नाटकाला अत्यंत जीवघेणी आर्तता दिली आहे. म्हणूनच नटसम्राट या नाटकाने प्रत्येक मराठी नाट्यरसिकाच्या मनात घर केले आहे. २३ डिसेंबर १९७० रोजी संध्याकाळी, बिर्ला मातोश्री सभागृह, मुंबई येथे नटसम्राटचा पहिला प्रयोग झाला. गोवा हिंदू असोसिएशनने हे नाटक रंगमंचावर आणले होते. संस्थेचा सुवर्ण महोत्सवातला हा प्रयोग होता. या नाटकाचे दिग्दर्शन केले होते श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी. अप्पासाहेब बेलवलकरांची भूमिका केली होती डॉ. श्रीराम लागू यांनीय तर कावेरी साकारली होती शांता जोग यांनी. हे प्रयोगाच्या दृष्टीने जसे गाजले तसे साहित्यकृती म्हणूनही गाजले. काही समीक्षकांनी या कलाकृतीचा

'भाग्यवान कलाकृती' असे म्हणून गौरव केलेला दिसून येते.

**'नटसम्राट' संक्षिप्त आढावा :**

गणपतराव बेलवलकर (अप्पा)हे नटसम्राट आहेत परंतु आता वयोवृद्ध झालेले आहेत. त्यांची जाणीव असल्यामुळे अप्पा म्हणतात, 'कामकाज संपले हे दुःख आहे. पण वेळेत पुरे झाले हा आनंद आहे. अप्पाला त्यांनी केलेल्या कामाचा व नावलौकिकाचा आनंद आहे. त्यांना असे वाटते की, आता आपण या सर्व जबाबदारीतून बाजूला व्हावे म्हणून अप्पा आपल्यासंपत्तीची मुलांमध्ये वाटणी करतात. आणि म्हणतात, 'बेलवलकर नट म्हणून संपला. आता बाप म्हणून उरला आहे.'' या सर्व प्रकारानंतर कावेरी म्हणते, 'माणसं वाईट नसली तरी म्हातारपण वाईट असतं. पुढचं वाढलेलं ताट द्यावं, पण बसायचा पाट देऊ नये माणसानं.'' कावेरीच्या या वाक्याप्रमाणे पुढे त्यांच्या मुलांना अप्पाच व कावेरीच म्हातारपण जड वाटू लागते. बारा वर्षानंतर मुलाच्यासंसारातअडगळीचे रूप येते. शारदा वनंदा यांच्या तक्रारी सुरु होतातअप्पा—कावेरीची भावनात्मक अवहेलना होते. म्हणून ते दोघेआपल्या मुलीकडे यायला निघतात.

नंदाच्या घरून नाराज होऊन अप्पा व कावेरी नलूकडे निघतात. स्टेशनवर न्यायला कोणी येत नाही म्हणून अप्पा — कावेरीच्या मनात संशयाची पाल चुकचुकते. पण मग विठोबा, नलू व सुधाकर सारेच येतात आणि पुन्हा एकदा कौटुंबिक आनंदाचेउल्हसित चित्र प्रकटते.

काही दिवसांनंतर अप्पा—कावेरी यांचे वास्तव्य नलूला त्रासदायक होते. त्या पार्श्वभूमीवर अप्पा आणि कळवणकर यांची भेटहोते. या भेटीत अप्पा आणि कळवणकर यांच्यात वाद होतो व अप्पाकळवणकरांना निघून जायला सांगतात. कळवणकर रागाने निघून जातात. अप्पा—कावेरी यांची रवानगी आऊटहाऊसमध्ये होते. काही दिवसातच सुधाकरचा पगार घरातून चोरी होतो त्या चोरीचा आळ नलू अप्पावरती घेते व अप्पाच्या घराची झडती घेते. नंतर पैशाचे पाकीट कपाटातच सापडते. अप्पांच्या संतापाचा स्फोट होतो. त्या धक्क्यानेकावेरी मरण पावते.

अप्पासाहेब घरातून बाहेर पडतात आणि त्यांची शोधाशोध सुरू होते. घरातून बाहेर पडलेल्या अप्पाला रस्त्याने भेटलेल्या परक्या माणसात माणुसकी व आपलेपण जाणवते. नाटकाच्या शेवटी नाट्यगृहाच्या परिसरात पुनर्प्रतिष्ठा करणाऱ्या रंगमंचावर रमून गेलेले अप्पासाहेब दिसतात. विठोबाच्या मागोमाग घरातील सर्व त्यांचा शोध करीत येतात. नटसम्राटच्या झळाळत्या भूमिकेत फुललेले अप्पासाहेब देह ठेवतात. या वृद्ध पण खरी नटसम्राटाच्याअंतापर्यंतच 'नटसम्राट' विराम पावते.

**नटसम्राट नाटकातील शोकांतिका :**

नटसम्राट ही एक शोकांतिक नाटक आहे. ती एक नटाची शोकांतिका आहे. मनुष्यत्वाची निराशा आलेल्या माणसाची शोकांतिका आहे.ती एका कलावंताच्या घुसमटलेल्या मनाची शोकांतिका आहे. त्याचप्रमाणे ती कौटुंबिक ताणाची देखील शोकांतिका आहे. वृद्धत्वाच्या अटळ वेदनांतून फुललेली शोकांतिका म्हणूनही तिच्याकडे पाहता येते. वृद्धत्व हे नटसम्राटचे एक महत्त्वाचे शोककारण आहे. या वृद्धत्वाचे, त्यातील व्यथांचे, अवस्थांचे उल्लेख नाटकात ठीक ठिकाणी आलेले दिसतात. ही वृद्धत्वाची अस्वस्थता गणपतराव बेलवलकर यांच्या व्यक्तिरेखेतून प्रकटताना दिसतात. नाटकाच्या आरंभी गणपतराव लोकप्रियतेच्या शिखरावर असलेले, सर्व अर्थांनी परिपूर्ण असे नटसम्राट आहेत. या कृतार्थतेच्या उत्कट क्षणीच ते जाहीर करतात 'बेलवलकर नट म्हणून संपला. आता फक्त बाप म्हणून उरला आहे.' असे म्हणून बेलवलकर निवृत्त होऊन सर्वकाही मुलांना वाटून देतात आणि मग खऱ्या अर्थाने शोकांतिकेला सुरुवात होते. मुलांना सर्वकाही दिल्यावर या मुलांना म्हातार्याम बापाची अडचण होऊ लागते त्यामुळे बेलवलकरांची दमछाट होते. याचे कारण बाप आणि मुले या दोघांच्या सांस्कृतिक स्तरांत पडलेला फरक. अप्पा आपल्या लाडक्या नातीला म्हणजे नंदू व शारदाच्या मुलीला ढालगज गधडी चोरटी म्हणतात. दुर्दैवाने हे सर्व शारदाच्या कानावर पडते. आणि मग अप्पांनी या दिलेल्या शिव्या घर करतात. आणि इथेच तिचा आणि सासऱ्याचा म्हणजे अप्पाचा खटका उडतो. आज या शिव्या, शिव्या आहेत का? नंदूशी लग्न होऊन ती घरी आली, तेव्हा अप्पा काही वेगळ्या

राहणीने बोलत होती का? नसे असल्याचे दिसत नाही. पण शारदाची ही बदललेली भूमिका अप्पाच्या मनाला लागते. पर्यायी अप्पाला मुलीच्या घरी म्हणजे नलूच्या घरी राहायला जावे लागते परंतु तिथेही अप्पाचे मन दुखावले जाते. तिथे अप्पावरती चोरीचा आरोप केला जातो. या आरोपाने कावेरी मरण पावते.

दोन्ही मुलांचे अप्पावरती व कावेरीवरती खुप प्रेम असतेपण ते दोघेही बदललेली आहेत. अप्पा मात्र आहे तसेच राहिलेले दिसतात. 'संस्काराचे हे एक प्रतिष्ठीत टोक उंच आणि उंच. दुसरे टोक म्हणजे बेलवलकर. अगदी हेंगू माणूस. नट तर त्याहीपेक्षा मोठा. पण त्याचे वागणे आणि बोलणे त्या प्रतिष्ठित उंचीवर न चालणारे.' अशाप्रकारे अप्पा व मुले यांच्यात अंतर पडत चाललेले दिसून येते.परिणामी अप्पाला एकटे पण जाणवायला लागते म्हणून बेलवलकर नाटकात म्हणतात.,

'सुर म्हणतो साथ दे
दिवा म्हणतो वात दे
उन्हामधल्या म्हाताऱ्याला
फक्त तुझा हात दे'

अशा प्रकारे बेलवलकर आपली शोकांतिका व्यक्त करताना दिसतात.

**नटसम्राट नाटकातील व्यक्तिचित्रण :**

नटसम्राट नाटकात अनेक व्यक्तिरेखा आलेल्या दिसतात. यातील सर्व व्यक्तिरेखा महत्त्वपूर्ण असलेल्या पाहायला मिळतात. त्यापैकी काही खालीलप्रमाणे.

**१. गणपतराव (अप्पा) बेलवलकर :**

अप्पा बेलवलकर ही या नाटकातील प्रधान व्यक्तिरेखा असून संपूर्ण नाटक या व्यक्ती भोवती फिरताना दिसते. अप्पा नटसम्राट आहेत. त्यांना एक मुलगा व एक मुलगी आहे. त्यांचा या मुलांवरतीखूप विश्वास आहे परंतु वृद्धावस्थेत त्यांची मुले त्यांची साथ सोडतात. या नाटकातून या व्यक्तीची शोकात्मिका दर्शवलेली आहे. वयाच्या साठी पर्यंतचा त्यांचा काळ अतिशय उत्तुंग असा असलेला चित्रित केलेला दिसतो. तसेच एक कुटुंबवत्सल गृहस्थ म्हणूनही या नटाने आपली जबाबदारी चांगल्या तऱ्हेने पार पाडली आहे.

**२. कावेरी :**

कावेरी ही अप्पा बेलवलकर यांची पत्नी आहे. नटसम्राट मध्ये गणपतराव बेलवलकर यांच्या नंतर महत्त्वाचे व्यक्तिचित्रण कोणाचे असेल तर ते कावेरीचे. महाराष्ट्रीयन मध्यमवर्गीय पतीव्रतेचा एक नमुनाच शिरवाडकरांनी कावेरीच्या रूपाने चित्रित केला आहे. कावेरी उदार मनाची, समजूतदार व क्षमाशील आहे. आपल्या मुलांवर व पतीवर जिवापाड प्रेम करणारी आहे. मुलांना झालेली अडचण व मुलांच्या घरी पतीचा होणारा अपमान यावरती पर्याय म्हणून मोरवाडीला मुळगावी जाऊन शेती करण्याचा निश्चय करणारी आई व पत्नी कावेरीच्या रूपाने दिसते. मुलीच्या घरी झालेल्या चोरीचा संशय अप्पा व कावेरीवर घेतला जातो. या धक्याने कावेरी मरण पावते.

**३. नंदा :**

नंदा हा अप्पा बेलवलकरांचा मुलगा आहे. याने एम. कॉमचे शिक्षण घेतले आहे. चांगल्या कंपनीत काम करतो आहे.अप्पांनी संपत्तीचे वाटप केल्या नंतर नंदाची भूमिका बदलते व त्याचे व अप्पाचे जमेनासे होते. तो पत्नीच्या सगण्यावरून अप्पांचा व आईचा राग राग करतो. हे पात्र लेखकाने कामावत्या व हायसोसायटीमध्ये राहणाऱ्या मुलाची आई वडिलांविषयी असणारी भूमिका चित्रित केली आहे.

**४. ठमी :**

ठमी चे नाव सुहासिनी आहे ती अप्पांची लाडकी नात आहे परंतु अप्पा तिला लाडाने ठमी असे म्हणत. ती नंदा व शारदा यांची गोड मुलगी आहे. अप्पांच्या दुःखपूर्ण जिण्याला मिळालेला हा मधुर उःशाप.

**५. नलू :**

नलू ही अप्पाची लाडकी मुलगी असते. तिचेही शिक्षण एम.ए. पर्यंत झालेले आहे. तिचे लग्न झाल्यावर ती कार्लेकर होते. तिचा नवरा इंजिनियर आहे. नंदाचे आणि अप्पाचे पटत नाही त्यावेळेस अप्पा व कावेरी नलूकडे रहायला जातात. काही दिवस नलू अप्पांना आनंदाने सांभाळते. कळवणकर आणि अप्पा यांच्यात एक दिवस चर्चे दरम्यान वाद होतात व अप्पा कळवणकरांना घरातून जाण्यास सांगतात. त्यामुळे नलू अप्पा व कावेरीला आऊटहाउसमध्ये राहण्यास सांगते. काही दिवसाने अप्पावरती नलू चोरीचा आरोप करते.

म्हणून आप्पा व कावेरी नलूचे घर सोडून जातात.

६. विठोबा :

नटसम्राट मध्ये विठोबा हे एक गौण पण महत्वाचे पात्र आहे. अप्पासाहेबांना हा विठोबा नलूच्या घरी जाताना स्टेशनवरती घ्यायला आलेला असतो तेथे भेटतो. तो नलुचा घरचा नोकर असतो. विठोबा हा धांदरट, गडबड्या स्वभावाचा असतो. त्याला नाटकाची, अभिनयाची आवड असते त्यामुळे त्याची आणि अप्पाची नाळ जुळते. अप्पाविषयी त्याच्या मनात भक्तिभाव आहे. जावयाच्या घरून अप्पा जेंव्हा नाहीसे होतात तेंव्हा विठोबा त्यांचा शोध घेण्यासाठी नलूचे घर आणि नोकरी सोडतो. असे हे माणुसकीचे प्रत्यय देणारे पात्र लेखकाने विठोबाच्या रूपाने दर्शवले आहे.

७. राजा :

राजाचा प्रवेश आपल्याला अखेरच्या प्रवेशात दिसतो. राजा हा पंधरा वर्षाचा पोरगा थिएटरजवळ बूटपॉलिश करतो. पूलाजवळच्या उघड्या झोपडीत सुखाने नांदतो. या अडाणी, दरिद्री पोराच्या हृदयातील माणुसकी जागी आहे. म्हणूनच भ्रमिष्ट अवस्थेतल्या अप्पांना तो आधार देतो. लेखक राज्याच्या रूपाने रस्त्यावर भेटलेली माणसे किती आपुलकीने आणि जिवाची असल्यागत वागतात आणि आपली रक्ताची माणसे कशी वागतात याचा प्रत्यय दर्शवतात.

वरील प्रमाणे नटसम्राट नाटकातकाही महत्त्वाची पात्रे आलेली पहायला मिळतात. या पात्रांच्या अनुषंगाने नटसम्राट नाटक उलगडत जाते.

समारोप :

नटसम्राट या नाटकाने प्रत्येक मराठी नाट्यरसिकांच्या मनात घर केले आहे. शेक्सस्पियरच्या 'किंग लियर' ने शिरवाडकरांच्या लेखनाला चालना दिली असली तरी त्यांच्या प्रतिभेने झेप घेऊन ह्या नाटकाला अत्यंत जीवघेणी आर्तता दिली आहे. यांतील गणपतराव बेलवलकर ह्या वृद्ध नटाचे आणि त्यांच्या 'सरकार' कावेरी यांचे व्यक्तिचित्रण अनेक कलावंतांना मोह पाडणारे आहे.आजही या नाटकाची लोकप्रियता टिकून आहे. कारण पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात दि. २७ ऑगस्ट २०१३ या दिवशी नटसम्राट या नाटकाचे सकाळी पावणेसहा वाजता सुरू झालेले आणि एकापाठोपाठ सलग चाललेले 'नटसम्राटचे' एकाच नटसंचातले एकूण आठ प्रयोग २८ऑगस्टच्या दुपारी दीड वाजता संपले. हे प्रयोग एकूण ३१ तास ४५ मिनिटे चालले होते. हा बहुधा जागतिक विक्रम असावा. 'तीर्थराज', 'रंगमैत्री' आणि दादा कोंडकेफाउंडेशन यांनी हे प्रयोग रंगमंचावर सादर केले होते. गिरीश देशपांडे यांनी या नाटकाचे दिग्दर्शन केले होते व अप्पासाहेब बेलवलकरांची भूमिकाही केली होती. तसेच या नाटकावरती २०१६ ला महेश मांजरेकर दिग्दर्शित 'नटसम्राट' हा मराठी चित्रपट निर्मित केला. या चित्रपटाला देखील खूप प्रसिद्धी मिळालेली आहे. अशा प्रकारे १९७० पासून आज पर्यंतच्या कालखंडात या नाटकाची लोकप्रियता टिकून असलेली दिसून येते.

संदर्भ ग्रंथ :

१. शिरवाडकर वि. वा.,'नटसम्राट', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, तिसरी आवृत्ती.

२. संपा. पाटील गो. तु.,'नटसम्राट समीक्षा', सारांश प्रकाशन, द्वितीय आवृत्ती.

❑❑❑